# प्रपत्र -१

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम ,२००४ कलम ५ मधील तरतुदीनुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि जास्तीत जास्त १५ अन्य सदस्य याप्रमाणे १७ सदस्यांची समिती नियुक्त करता येईल. या समितीवर शिर्डी नगरपंचायतीचा अध्यक्ष हा पदसिध्द सदस्य असेल. सदर तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) नियम २०१३ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) (सुधारणा) नियम, २०२१ नुसार सदस्यांची अर्हता खालीलप्रमाणे :-

१) महाराष्ट्राचा कायम रहिवासी व साईबाबांचा भक्त असणे आवश्यक आहे.
२) जाहिरातीचे दिवशी अर्जदाराचे वय २५ वर्षापेक्षा कमी व ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.
३) कॅलेंडर महिन्यात किमान दोन दिवस संस्थानाच्या कामासाठी उपस्थित राहू शकेल.

**तसेच, इतर आवश्यक अर्हता पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र | पद | संख्या | नियमांतील तरतुद | किमान अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | १ | ---- | विशिष्ट अर्हता / अनुभवाची अट नाही. |
| २ | उपाध्यक्ष | १ | कलम ५ (२) मधील परंतूक (२) | विशेषीकृत ज्ञान या गटातील व्यक्ती |
| ३ | सदस्य (महिला) | **किमान १** | कलम ५ (२) मधील परंतूक (१) | विशिष्ट अर्हता / अनुभवाची अट नाही. |
| ४ | सदस्य (सामाजिक व आर्थिकदृष्टया कमकुवत घटक) | **किमान १** | कलम ५ (२) मधील परंतूक (१) | जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच कमी उत्पन्नाचा दाखला. |
| ५ | सदस्य ( व्यावसायिक किंवा विशेषीकृत ज्ञान धारण करणा-या व्यक्ती ) | **किमान ८** | कलम ५ (२) मधील परंतुक (२) | प्रत्येक पदाची अर्हता पुढीलप्रमाणे आहे :- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १) विधि | ८ पैकी किमान १ | नियम २०१३ मधील अनुसूचीतील अ.क्र.१ | विधिमधील पदवी (एल.एल.बी) धारण केलेली असावी आणि महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेकडे किमान ५ वर्षाकरिता अधिवक्ता म्हणून नोंदणी केलेली असावी आणि जिल्हा न्यायाधीश किंवा प्रबंधक, उच्च न्यायालय यांनी दिलेले वकील व्यवसाय प्रमाणपत्र धारण केलेली असावे. |
| | | २) व्यवसाय व्यवस्थापन किंवा लेखाशास्त्र किंवा वित्त व्यवस्था<br>किंवा<br>लोकप्रशासन | ८ पैकी किमान १ | नियम २०१३ मधील अनुसूचीतील अ.क्र.२ | व्यवसाय प्रशासनामधील पदवी (बी. बी.ए.) किंवा अन्य समतुल्य पदवी व्यवस्थापकीय पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असावी किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेकडे किमान ५ वर्षाच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल म्हणून नोंदणी केलेली असावी किंवा अर्थशास्त्र अथवा वित्तव्यवस्था यांमधील पदवी धारण केलेली असावी.<br>किंवा<br>लोक प्रशासनामधील पदवी आणि किमान ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असावी किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा पदावरुन सेवानिवृत्त झालेली व्यक्ती असावी. |
| | | ३) अभियांत्रिकी<br>किंवा<br>वास्तुशास्त्र | ८ पैकी किमान १ | नियम २०१३ मधील अनुसूचीतील अ.क्र.३ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई) किंवा पदविका आणि अभियांत्रिकी उपक्रमांमधील किमान ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असावी.<br>किंवा<br>वास्तुशास्त्रामधील पदवी (बी.आर्क.) किंवा पदविका आणि ५ वर्षाचा अनुभव. |
| | | ४) सार्वजनिक आरोग्य किंवा | ८ पैकी किमान १ | नियम २०१३ मधील अनुसूचीतील अ.क्र.४ | एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस. / बी.यु.एम.एस. / बी.एच.एम.एस. पदवी धारण करणारी असावी आणि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | औषध वैद्यकशास्त्र | | | रुग्णालय प्रशासन किंवा आरोग्य संस्था यामधील किमान ५ वर्षांचा अनुभव असलेली वैद्यक व्यवसायी. |
| | | ५) ग्रामीण विकास | ८ पैकी किमान १ | नियम २०१३ मधील अनुसूचीतील अ.क्र.५ | कोणत्याही ज्ञानशाखेतील पदवीधर असावी आणि ग्रामीण क्षेत्रांच्या विकासामधील किमान ५ वर्षाचा अनुभव आणि प्राविण्य मिळवलेले असावे. तसेच राज्य किंवा केंद्र शासनाने त्यास मान्यता दिलेली असावी. |
| ६ | सदस्य (सर्वसाधारण) | | **<u>कमाल ७</u>** | नियम २०१३ मधील नियम.क्र.३ (३) | १) एकतर जे भक्तमंडळाचे आश्रयदाते किंवा आजीव सदस्य असतील.<br>आणि<br>२) पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणताही घटक विचारांत घेण्यात येतील:-<br>(एक) स्नातक पदवी धारण करणे ;<br>(दोन ) शिर्डीतील किंवा अहमदनगर जिल्हयातील रहिवाशी असणे;<br>(तीन) सामाजिक किंवा शैक्षणिक बांबीमध्ये अथवा सामाजिक किंवा शैक्षणिक विकासामध्ये व्यक्तीने दिलेले योगदान;<br>(चार ) शिर्डीचे प्रतिनिधित्व करणारा संसद सदस्य अथवा शिर्डी विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारा राज्य विघानमंडळाचा सदस्य असणे. |

# अर्जाचा नमुना

श्री साईबाबा संस्थान , शिर्डी या देवस्थानाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष / सदस्य पदासाठी अर्ज नमुना.

नाव :-

पत्ता :-

दिनांक :-

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी,
ता. राहता, जि. अहमदनगर,
पिन :- ४२३१०९
**ई मेल** :- ceo.ssst@sai.org.in

विषय :- श्री साईबाबा संस्थान , शिर्डी या देवस्थानाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य पदासाठी अर्ज.

महोदय / महोदया,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी या देवस्थानाच्या " श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती " या समितीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य ( प्रपत्र - १ प्रमाणे कोणत्या पदासाठी अर्ज सादर करण्यात येत आहे याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.) या पदासाठी मी अर्ज सादर करीत आहे.

मी, ज्या पदासाठी अर्ज करीत आहे त्या पदासाठी (प्रपत्र -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ) आवश्यक असलेली किमान अर्हता मी धारण करीत असून त्यासंदर्भात आवश्यक असलेली कागदपत्रे मी या अर्जासोबत जोडली आहेत. तसेच, " नमुना- ख " मध्ये नमूद प्रतिज्ञापत्र या सोबत जोडले आहे.

आपला

स्वाक्षरी

( नाव )

E:\शिर्डी जाहिरात\जाहिरात नमुना.odt

नमुना -क

(नियम ६ व कलम ८ पहा)

सदस्य म्हणून नियुक्ती करण्याकरिता द्यावयाचे शपथपत्र

| |
|---|
| अभिसाक्षीचे पासपार्ट आकारातील अलीकडेचे छायाचित्र |

मी-----------------------------------(नाव)------------------------------------------

(पत्ता)------------------------------------------(वय) याद्वारे, गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की,

(१) मी, महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवाशी आहे;

(२) मी, शिर्डीचे श्री साईबाबा यांचा भक्त आहे आणि शिर्डीच्या श्री साईबाबांची शिकवण व तत्वे यांवर विश्वास ठेवतो;

(३) मला संस्थानाची ध्येये व उद्दिष्टे मान्य आहेत;

(४) मी, संस्थानचे नियम व विनियम वाचले असून त्यांचे पालन करण्याचे मी मान्य करतो;

(५) मी, संस्थानाच्या हितास बाधक किंवा हानीकारक होतील अशी कोणतीही कामे करणार नाही;

(६) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम ,२००४ (सन २००४ चा महा .१४) यांच्या कलम ९ किंवा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी (व्यवस्थापन समितीचा सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने )नियम, २०१३ नुसार कोणत्याही बाबतीत मी अनर्ह ठरलेलो नाही;

(७) दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा होईल अशा अपराधासाठी किंवा नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधासाठी, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने मला यापूर्वी कोणत्याही वेळी दोषी ठरवलेले नाही किंवा माझ्यावर दोषारोपपत्र दाखल केलेले नाही;

(८) मी, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या किमान दोन दिवशी संस्थानाच्या कार्यामध्ये उपस्थित राहीन , हे मान्य करतो व तसे वचन देतो.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती होण्याकरीता मी हे शपथपत्र दाखल करीत आहे.

दिनांक:-

ठिकाण:-

(अभिसाक्षीची सही)

उपरोक्त परीच्छेद-(१) ते (८) यामध्ये दिलेली माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व अचूक आहे, याची पडताळणी केलेली आहे.

याकरिता सत्यापित करण्यात येते.

माझ्या समक्ष (अभिसाक्षी)

E:\शिर्डी जाहिरात\जाहिरात नमुना.odt

नमुना-ख

कलम १० च्या पोट कलम १ च्या खंड (ख) प्रमाणे प्रतिज्ञापत्राचा नमुना

दिनांक :

प्रति,

प्रधान सचिव,
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ याच्या कलम ८ नुसार व्यवस्थापन समितीच्या सदस्याचे प्रतिज्ञापत्र.

महोदय,

मी,-------------------------------------------- (नाव, पत्ता व वय ) याद्वारे घोषित करतो की,

(१) मी महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवाशी आहे;

(२) मी, शिर्डीचे श्री साईबाबा यांचा भक्त आहे आणि शिर्डीच्या श्री साईबाबांची शिकवण व तत्वे यांवर विश्वास ठेवतो;

(३) मला संस्थानाची ध्येये व उद्दिष्टे मान्य आहेत;

(४) मी, संस्थानाचे नियम व विनियम वाचले असून त्यांचे पालन करण्याचे मी मान्य करतो;

(५) मी, संस्थानाचे हितास बाधक किंवा हानीकारक होतील अशी कोणतीही कामे करणार नाही;

वैयक्तिक माहिती

(१) पूर्ण नाव : (आडनाव) (पहिले नाव) (मधले नाव)

(२) जन्मदिनांक :

(३) वय :

(४) शैक्षणिक अर्हता :

(५) धंदा/व्यवसाय :

(६)इतर कार्य : (समाजकार्य इत्यादी)

(७) कायमचा पत्ता :

(८) सध्याचा पत्ता:

(९) दूरध्वनी क्रमांक : कार्यालय...............................निवास.......................

(१०) भ्रमणध्वनी क्रमांक :

(११) फॅक्स क्रमांक :

(१२) ई-मेल :

सदस्याची सही.

E:\शिर्डी जाहिरात\जाहिरात नमुना.odt